# दि भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि ; नांदेड

(नोंदणी क्र.एनएनडी/बीएनके १३६ (ऑफ)१९८३ दि.१५-०४-१९८३)
मुख्य कार्यालय : 'भाग्यलक्ष्मी भवन' महावीर चौक,नांदेड-४३१६०१
फोन :२३३२१४,२३६७९५,२४५०३८,२४५०४२ फॅक्सः ०२४६२-२४२२२७
email:bhagyalakshmimahila@yahoo.com

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

सन्माननीय सभासद बंधू भगिनींना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपल्या दि भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि., नांदेडची **३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा भारतीय सौर १ आश्विन शके १९३८ म्हणजेच २३ सप्टेंबर २०१६ रोज शुक्रवार सायंकाळी ५.३० वाजता हॉटेल अतिथी, शिवाजीनगर,नांदेड** येथे बँकेच्या अध्यक्षा मा. सौ. सीमाताई अतनूरकर यांच्या अध्यक्षतेखाली, खालील विषयावर विचार करण्यासाठी बोलावण्यात आली आहे. तरी सर्व माननीय सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

**सभे पुढील विषय :**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. सन २०१५-१६ चा संचालक मंडळाचा अहवाल तसेच वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकास मान्यता देणे.
३. सन २०१५-१६ च्या वैधानिक लेखा परिक्षकाच्या अहवालाची वाचुन नोंद घेणे व सन २०१५-१६ च्या लेखा परिक्षण अहवालावरील दोष दुरुस्तीची वाचुन नोंद घेणे.
४. सन २०१६-१७ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे.
५. मा. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे निव्वळ नफ्याचे वाटप करणे.
६. सन २०१६-१७ या वर्षासाठी वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. बँकेच्या पंचवार्षिक विकास आराखड्यास मान्यता देणे.
८. ज्या सभासदांचे भाग भांडवल रु.१०००/- व १००० च्या पटीपेक्षा कमी आहे. त्यांना भागभांडवलात भरपाई करण्यासाठी मुदत देणे बाबत.
९. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदाच्या रजेला मान्यता देणे.
१०. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

भारतीय सौर दि.०८ श्रावण शके १९३८
दिनांक : ३०-०७-२०१६
ठिकाण : नांदेड

मा. संचालक मंडळाच्या वतीने

**मधुकर कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

### : सभासदांना विशेष सूचना व विनंती :

१. गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास , त्याच ठिकाणी १/२ तासानंतर तहकुब सभेचे कामकाज सुरु होईल. सदर सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेत ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १३-०९-२०१६ च्या आत बँकेच्या मुख्य कार्यालयास कामकाजाच्या वेळात कृपया लेखी कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांची नोंद घेतली जाणार नाही.
३. सभेस येतांना सोबत नोटीस आणावी. वार्षिक अहवालाची प्रत आपणास सभेत दिली जाईल.
४. सभासदांनी त्यांच्या पत्त्यातील बदलाची सूचना लेखी स्वरुपात मुख्य कार्यालयात नोंदवावी.
५. **ज्या सभासदांचे भाग भांडवल रुपये १,०००/- च्या आत आहे,त्यांनी फरकाची रक्कम भरुन ते कमीत कमी रुपये १,०००/- चे करावे.**
६. ज्या सभासदांना शेअर्स सर्टिफिकेट अद्याप मिळालेली नाहीत, त्यांनी आपले सभासदत्व असलेल्या शाखेकडे संपर्क करावा.